Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE 21km
17 Dec 2017
DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon

हैं तय्यार हम...

ऑरा क्रिएटर्स ग्रुप : डावीकडून चित्रावती सोनवणे, मेयमौना खान, कोमल लोहाडे, निकिता पहाडे, नरेंद्र कोठाळे, सृष्टी गंगवाल, नामदेव पानरे, लालचंद भाटी, शेख अखलाख, राजेश काला, बिजय पात्रा, प्रमोद जाधव, मनोज काला, सौरभ देशमुख, फकिरचंद, योगेश सुपेकर, मनोज पंचगल्ले, अजय यादव, साईनाथ ढांगरे, अनुप देबडवार, अक्षता नागपुरे, स्मीतल अष्टीकर, अमृता हनुमंते.

परिवर्तन रॉक ट्रेकर्स
(डावीकडून उभे)- दीपक नरवडे, राम सुरवसे, हसन देवणीकर (ग्रुप ॲडमिन), अरविंद कदम, विनोद मिरगे, रोषण वाणी, सुशील मापारी, अमोल सावरकर, शरद राठोड, अजय जगदाळे, मयुर सराफ, श्रीपाद मेहेत्रे, विजयकुमार कट-के, निळकंठ गड्डे. (खाली बसलेले) - गजानन फुंडे, चंद्रशेखर मुंडे, नंदकिशोर चाटे, प्रकाश राठोड.

ग्रुप बुकिंगसाठी त्वरा करा

महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग लवकरात लवकर निश्चित करावा. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत करता येईल. या स्पर्धेत शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी ९९२२०३०७००, ०२४०-३०२४७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनही करता येईल. त्यासाठी धावपटूंनी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.

स्पर्धा
- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

लव्हबर्ड्समधील भांडणं संपली...

आलिया भट्ट आणि सिद्धार्थ मल्होत्रा यांच्या नात्याबद्दल आतापर्यंत आपल्या सगळ्यांना माहिती झाले आहे. दोघे एकमेकांशी भांडतात आणि पुन्हा एकत्र येतात. काही दिवसांपूर्वी दोघांच्या ब्रेकअपची मीडियामध्ये चर्चा होती. एवढेच नाही तर इत्तेफाकच्या प्रेस कॉन्फ्रेंस दरम्यान सिद्धार्थ सगळ्यांसमोर एकटाच आला होता. प्रेस कॉन्फ्रेंस संपून काही दिवसच झाले असतानाच दोघे पुन्हा एकदा एकत्र आल्याच्या बातम्या पण येऊ लागल्या. सिद्धार्थ आणि आलिया एकमेकांना खूप पसंत करतात आणि एकमेकांपासून कधीच वेगळे होऊ शकत नाहीत. भांडण झाल्यानंतर दोघे एकमेकांना भेटण्याची संधी शोधत असतात. शाहरुख खानच्या बर्थ डे पार्टीत हे दोघे एकत्र दिसले होते. एवढेच नाही तर सिद्धार्थने आदल्या दिवशी घातलेल्या टी-शर्टमध्ये घालून दुसऱ्या दिवशी आलिया मीडियासमोर आली. त्यामुळे त्यांचे अफेअर पुन्हा एकदा चर्चेत आले. दोघांची जोडी 'सडक २' मध्ये दिसणार असल्याची चर्चा आहे. या चित्रपटात लीड रोलमध्ये पूजा भट्ट आणि संजय दत्त दिसणार आहेत. याशिवाय काही तरुण चेहऱ्यांना सुद्धा या चित्रपटात घेण्यात येणार असल्याची चर्चा आहे. त्यासाठी सिद्धार्थ आणि आलियाचे नाव चर्चेत आहे. हा चित्रपट पुढच्या वर्षी ऑगस्ट महिन्यात रिलीज करण्यात येणार आहे.

'मैने प्यार किया'चा सीन मालिकेत पाहायला मिळणार!

सूरज बडजात्या यांच्या 'मैंने प्यार किया' या चित्रपटाला आज इतके वर्षं झाले असले तरी या चित्रपटाची लोकप्रियता थोडी देखील कमी झाली नाही. या चित्रपटातील सुमन आणि प्रेमची केमिस्ट्री प्रेक्षकांना प्रचंड भावली होती. त्यामुळे राजश्री प्रोडक्शनसाठी हा चित्रपट खूपच खास आहे. आता याच चित्रपटातील एका दृश्याची जादू प्रेक्षकांना एका मालिकेत अनुभवता येणार आहे. ही मालिका प्रेक्षकांना प्रचंड आवडते. या मालिकेने नुकताच काही वर्षांचा लीप घेतला आहे. लीपनंतर तर या मालिकेच्या कथानकाला अनेक कलाटण्या मिळाल्या आहेत. या मालिकेत प्रेक्षकांना आता एक खूप छान सीन पाहायला मिळणार आहे. मैंने प्यार किया मधील टेरेस वरचा सीन आजही प्रेक्षकांच्या चांगल्याच स्मरणात आहे. या दृश्यात लाजाळू भाग्यश्रीला सलमान खान वरील प्रेम सिद्ध करण्यासाठी शॉर्ट कपडे घालावे लागतात आणि मग ती एका मोठ्या बेडशीटमध्ये स्वतःला गुंडाळून घेते? सूरज बडजात्या हा क्षण पुन्हा एकदा त्यांच्या लोकप्रिय फिक्शन ड्रामा या मालिकेमध्ये निर्माण करणार आहेत.

सुप्रियाच्या पायावर रुपल करतेय उपचार!

टीव्ही मालिकांमधलं सासू-सुनेचे नाते विळ्या-भोपळ्यासारखे असल्याचे अनेकदा पाहायला मिळते. एका मालिकेतील कांचन म्हापसेकर आणि राधा यांच्यातले नाते तितके टोकाचे नाही. मात्र, मालिकेच्या सेटवर राधा अर्थात रुपल आपल्या ऑनस्क्रीन सासुबाईंची म्हणजेच सुप्रिया विनोद यांची पूर्ण काळजी घेत आहे. रुपल ही अभिनेत्री असली तरी ती अभिनेत्री व्हायच्याआधी फिजिओथेरपिस्ट होती हे खूपच कमी जणांना माहिती आहे. रुपल फिजिओथेरपिस्ट असली तरी तिला अभिनयाची आवड असल्याने तिचा या क्षेत्रात प्रवेश झाला. त्यामुळे रुपल सुप्रिया विनोद यांच्या दुखऱ्या पायाचे बँडेज करण्यापासून सगळे करत आहे. मालिकेची टीम ही एखाद्या कुटुंबाप्रमाणेच राहात असते. एकमेकांच्या अडीअडचणींमध्ये पाठीशी उभे राहणे, मदत करणे, काळजी घेणे असे सगळे होत असते. या मालिकेतील सुप्रिया विनोद यांचा पाय काही दिवसांपूर्वी मुरगळला होता. मात्र मालिकेच्या चित्रीकरणाच्या गडबडीत त्यांना पायाकडे नीट लक्ष देता आले नाही आणि पर्यायी पाय सुजला. ते रूपलच्या लक्षात आले.

cnx. AURANGABAD | 15:11:2017 | www.cnxmasti.com
ENTERTAINMENT | TV | ON SCREEN | PROMOTIONAL FEATURES | LIFESTYLE
लोकमत

काही दिवसांपूर्वी भारतीय लष्करातील एका सैनिकाबद्दल वादग्रस्त वक्तव्य करून विद्याने खळबळ उडवून दिली होती. आता पुन्हा एकदा विद्याने असेच काहीसे वक्तव्य करीत वादाला फोडणी दिली आहे. तिने म्हटले की, 'मी स्त्रीवादी आहे, परंतु पुरुषविरोधी नाही.' विद्याने म्हटले की, 'मी अशी व्यक्ती आहे, जिच्या मते प्रत्येक महिलेला पुरुषांप्रमाणे आयुष्य जगायला हवे.'

Glam Window

गर्लगँगसोबत आलियाची नाइट आऊट पार्टी!

आलिया भट्ट हिने अलीकडेच तिच्या आगामी मेघना गुलजारचा चित्रपट 'राझी'चे शूटिंग पूर्ण केले आहे. त्यामुळे ती आता तिचा फ्री टाइम तिच्या गर्लगँगसोबत एन्जॉय करत आहे. नुकतीच ती तिच्या फ्रेंडससोबत क्वालिटी टाइम घालवताना दिसली. या पार्टीत आलिया एकदम फ्रेश दिसत होती.

अभि-ऐशचा रोमँटिक अंदाज...

अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या रॉय बच्चन यांच्या लग्नानंतर त्यांना आराध्यासारखी गोड मुलगी झाली. लग्नाच्या एवढ्या वर्षानंतरही त्यांच्यातील प्रेम अद्याप कमी झालेले नाही. अलीकडेच ते दोघे एका लग्नात आले असता फोटोग्राफर्सनी त्यांना अशा फोटोत कैद केले.

'या' चित्रपटांनी सेलिब्रेट केली 'फिमेल फ्रेंडशिप'!

'शोले' चित्रपटातील 'जय-वीरू' या जोडीच्या मैत्रीचा आपण आजही दाखला देतो. जय-वीरू अर्थात अमिताभ बच्चन आणि धर्मेंद्र यांच्या मैत्रीची सुरुवात पडद्यावरुन झाली ती वैयक्तिक आयुष्यातही तशीच आज कायम आहे. पडद्यावर केवळ 'मॅन टू मॅन' फ्रेंडशिपच दाखवण्यात आली आहे असं नाही तर 'फिमेल फ्रेंडशिप' म्हणजेच पडद्यावरील दोन अभिनेत्रींमध्येही उत्तम मैत्री दाखवण्यात आली आहे. दोन तरुणी किंवा दोन अभिनेत्री कधी चांगल्या मैत्रिणी होऊ शकतात का? असा प्रश्न तुमच्या मनात निर्माण झाला असेल तर तुम्हाला चुकीचे ठरवणारे काही दाखले आमच्याकडे आहेत. पाहूयात अशाच काही 'फिमेल फ्रेंडशिप्स' ज्या मोठ्या पडद्यावर चित्रपटांतून दाखवण्यात आल्या आणि त्या लोकांना भावल्याही....

cnx. Exclusive
अबोली कुलकर्णी

पिंक

तापसी पन्नू आणि अमिताभ बच्चन यांच्या मुख्य भूमिकेतील चित्रपटाची प्रेक्षकांसोबतच समीक्षकांनीही वाहवा केली. चित्रपटातील सगळ्यांचाच अभिनय कौतुकास्पद आहे. मात्र, तुम्ही पाहिले असेल मिनल अरोरा (तापसी पन्नू) जेव्हा जेलमध्ये जाते तेव्हा तिच्या दोन मैत्रिणी अँड्रिआ आणि फलक तिला एकटीला सोडून न देता तिला पाठिंबा देतात. 'कठीण प्रसंगी महिलाच एकमेकांच्या मागे खंबीरपणे उभ्या राहतात,' असा संदेश दिग्दर्शक शूजित सरकार यांनी या चित्रपटातून दिला आहे.

क्वीन

कंगना राणौत हिच्या मुख्य भूमिकेतील 'क्वीन' चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळालेला आहे. जेव्हा एखादा पती त्याच्या पत्नीला आयुष्यात एकटीलाच सोडून निघून जातो, तेव्हा तिच्या मनाची काय परिस्थिती झाली असेल? अशाच काहीशा परिस्थितीचा सामना कंगना अर्थात व्यक्तिरेखा राणीला करावा लागला. त्यावेळी ती एकटीच होती अशावेळी विजय नावाच्या एका मुलीला भेटते. जी तिचा आधार बनते. या चित्रपटातून असा संदेश मिळतो की, अडचणीतून बाहेर पडायला तुम्हाला केवळ पुरूषच मदत करतात असे नव्हे तर मुली देखील एकमेकांचा आधार बनू शकतात.

ये जवानी हैं दिवानी

रणबीर कपूर, दीपिका पादुकोन, आदित्य रॉय कपूर यांच्या मुख्य भूमिकेतील 'ये जवानी हैं दिवानी' चित्रपटाचा उद्देश केवळ प्रवास आणि प्रेम हाच नव्हता. या चित्रपटाचे अजून एक विशेष असे होते, यात नैना (दीपिका पादुकोण) आणि आदिती (कल्की कोचलिन) या दोघींची मैत्री दाखवण्यात आली होती. बनी (रणबीर कपूर) च्या आयुष्यात जेव्हा काही वाईट होत असताना याच दोघी त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या होत्या.

चक दे इंडिया

शाहरुख खान हॉकीचा कोच आणि १२ महिला हॉकीपटू यांच्यावर आधारित चित्रपटाची थीम असून यातून दिग्दर्शकाने महिलांच्या एकीची शक्ती दाखवून दिली आहे. या १२ महिला वेगवेगळ्या स्तरातून आल्या असल्या तरीही त्या जर एकत्र आल्या तर काहीही करू शकतात, हे दाखवून दिले आहे. त्यांच्यात केवळ एकीच नव्हे तर मैत्रीचे बंध निर्माण होतात.

पार्च्ड

'पार्च्ड' चित्रपटात पुरुषांकडून मिळालेली दुय्यम वागणूक आणि झालेले अन्याय, अत्याचार यांच्यामुळे त्रस्त असलेल्या तिघींची कहानी यात मांडण्यात आली आहे. पुरुषवृत्तीला नाकारून एकमेकांमध्येच एकमेकांचा आधार शोधणाऱ्या यातील ३ अभिनेत्री यांचा ग्रामीण जीवनातील संघर्ष चित्रपटातून मांडण्यात आला आहे. यादरम्यान त्या तिघींची जी मैत्री जुळते ती अगदी आयुष्यभर टिकणारी असते.

'खान' मंडळींशी साराचा पंगा...



साराने डेब्यू करण्यापूर्वीच बॉलिवूडमधल्या तीन सुपरस्टार्सशी पंगा घेतला आहे. साराने सलमान खान, आमिर खान यांच्यासोबत काम करण्यास नकार दिला. साराने सलमान खानचा चित्रपटात काम करण्यास नकार दिला ज्या चित्रपटातून सलमान आपला मेहुणा आयुष शर्माला बॉलिवूडमध्ये लाँच करतो आहे. यावर सलमानने अजून काही प्रतिक्रिया दिलेली नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, साराने एकता कपूरसोबत आपला दुसरा चित्रपट साइन देखील केला आहे. याआधी साराने सनी देओलच्या चित्रपटाची ऑफर देखील नाकारली आहे. सनीचा मुलगा करण देओलच्या अपोझिट साराला साइन करण्यात येणार होते. मात्र यासाठी तिने नकार दिला.

'पद्मावती' १ डिसेंबरलाच होणार रिलीज

सीबीएफसीचे अध्यक्ष प्रसून जोशींनी सांगितले की, 'आम्ही निर्माता संजय लीला भन्साळींचा आदर करतो ही दुर्भाग्यपूर्ण गोष्ट आहे की, त्याच्या चित्रपटात अडथळा येतो आहे. सीबीएफसी पॅनलवरचे सदस्य आपला व्यक्तिगत दृष्टीकोन व्यक्त करतायेत. पण सेन्सॉर बोर्डाच्या इतर सदस्यांनी यावर बोलण्यास नकार दिला आहे, तर बीजेपीचे नेता आणि सेन्सॉर बोर्डाचे सदस्य अर्जुन गुप्तांनी भन्साळींवर राजद्रोही म्हटले आहे. त्यांनी यासंदर्भात गृहमंत्री राजनाथ सिंग यांना पत्र पाठवून भन्साळींना शिक्षा देण्याची मागणी केली आहे. १ डिसेंबरला पद्मावती चित्रपट रिलीज होत आहे. मात्र सुरुवातीपासूनच काही सामाजिक संघटना चित्रपट बंद पाडण्याच्या तयारीत आहेत.

Preparation for
Dr. Homi Bhabha
Practical Exam (2nd Level)
6th & 9th
Now in CIDCO
PRASANNA EDU WORLD
Savarkar Nagar, N-5, CIDCO
7420880111|9765302289